<u>प्रेस नोट</u> <u>दिनांक ०१/०३/२०१९</u>

<u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>

चंदननगर पो.स्टे. चे हद्दीमध्ये दिनांक २७/०२/२०१९ रोजी वडगांवशेरी, पुणे येथील काळभैरवनाथ दैवताची यात्रा होती. सदर यात्रेमध्ये बंदोबस्ताकामी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर व पोहवा. हरीदास कदम, पोशि. राहुल इंगळे असे पायी पेट्रोलींग करीत होते. त्यावेळी रात्रौ २२.३० वा. चे सुमारास गर्दीमध्ये एक ५ वर्षाची मुलगी रडत असतांना लोकांच्या गर्दीमध्ये मिळुन आली. सदर मुलीस तिचे पुर्ण नाव व पत्ता सांगता येत नव्हते. मुलीचे आई, वडिलांचा शोध घेणेसाठी पोहवा. कदम व पोशि.नाणेकर यांना सांगितले असता, त्यांनी यात्रेमध्ये तिला ठिकठिकाणी गर्दीमध्ये नेवुन लोकांकडे विचारपुस करुन शोध सुरु केला. त्यानंतर वडगांवशेरी, भाजी मंडई येथे सदर मुलीचे वडिल गोविंद गुणाजी मुरकुटे, रा.साईकृपा सोसायटी, वडगांवशेरी, पुणे आणि आई सौ.स्वाती गोविंद मुरकुटे हे मिळुन आले व त्यांनी मुलीस पाहुन, त्यांची मुलगी मयुरी गोविंद मुरकुटे, वय ५ वर्षे असे असल्याचे त्यांनी सांगितले. मुलीस पाहुन मुलीचे आईचे डोळयामध्ये आणंदाश्रु येवुन, रडु लागल्या. मुलीचे आई, वडिल हे मुळचे नागपुर येथील असुन, ते नव्याने पुणे येथे कामानिमीत्ताने नव्याने राहासाठी आलेले आहेत. सुमारे ३ तास त्यांचा शोध घेतल्यानंतर आई, वडिल मिळुन आलेले होते. मुलीचे आई वडिलांना समजावुन सांगुन त्यांची मुलगी मयुरी त्यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे. मुलगी सुखुरुपपणे त्यांच्या ताब्यात मिळाल्याने तिचे आई, वडिल व नातेवाईक आणि राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी श्री.नारायण गलांडे यांनी आनंद व्यक्त करुन, पोलीसांचे आभार मानले आहेत.

सदरची चांगली कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक - कृष्णा इंदलकर, पोलीस निरीक्षक, गुन्हे – विठ्ठल दरेकर, पोहवा. हरीदास कदम, पोशि. राहुल इंगळे यांनी केलेली आहे.

